The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# "संत साहित्यातील गुरुभक्ती"

संशोधक विद्यार्थिनी : रुपाली गुलाबराव मगर
भाषा, वाङमय आणि संस्कृती संकुल, स्वा.रा.ति.म.विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावना -**

प्राचीन भारतीय संस्कृतीत संतांनी अध्यात्ममार्गात संतांच्या मार्गदर्शनाला तसेच गुरुंना वंदनीय स्थान दिले. संतांनी दाखविलेला भक्तीचा पंथ हा सामान्य स्वरुपाची लौकिक मार्ग नाही, तर ध्यानप्रधान भक्ती आहे. ईश्वराचे ध्यान हा या मार्गाचा गाभा असून तेच सर्व संतांनी नामस्मरण आणि नामसंकीर्तन या शब्दांनी सांगितले आहे.

अगदी प्राचीन संप्रदाय म्हणून 'नाथ' संप्रदाय आहे. तरीही या संप्रदायापूर्वीच्या सिध्द संस्कृतीत गुरुमहिमा प्रकर्षाला पोहोचला होता. मध्ययुगीन काळापर्यंत नाथ संप्रदायात 'गुरुमहिमा' वाढतच राहिला. म्हणूनच नाथ संप्रदाय हा गुरुमार्ग आहे. 'आदिनाथ गुरु सकल सिध्दांचा' म्हणजे 'शिव' हा गुरु सकल सिध्दांचा म्हणजे शक्तियुक्त परशिव मानला जातो. 'गुरुरत्र सन्मार्ग दर्शनशिल' असे गोरक्ष सिध्दांन्तात म्हटले आहे'.

नाथसंप्रदाय, हा पूर्णपणे योगविद्येवर आधारलेला संप्रदाय होय. कला, शास्त्र, किंवा कोणत्याही विद्या शाखेचे ज्ञान आत्मसात करावयाचे असेल तर त्यासाठी योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता असते. मग योगाभ्यासात तर 'गुरुं' ची आवश्यकता असतेच त्याशिवाय इच्छित साध्य साधताच येत नाही. असे हा नाथ संप्रदायाचा सिध्दांत आहे.

केवळ नाथच नव्हेच तर सर्वच संप्रदायातील संतांनी आपल्या साहित्यातून गुरुगौरव वर्णिला आहे. जो साधक आहे शिकणारा आहे. त्याला शिकविणारा मार्ग दाखविणाराही हवाच. 'गुरुविणा मोक्षाची वाट सापडणे म्हणजे अंधारात चाचपडण्यासारखे होय.' सर्व संतांनी 'गुरु' ला सर्वस्व मानले आहे. परमेश्वराहूनही श्रेष्ठ 'गुरुं' स्थान आहे. मानून आपलं जीवनच नव्हे तर जीवन साफल्यही गुरुच आहेत, असे संत मानतात.

म्हणूनच सर्व संतांनी 'सद्गुरु' महिमा वर्णिला त्याचा धांडोळा घेणे येथे आवश्यक वाटते. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ तसेच नाथसंप्रदायातील शिवदिन केसरी यांच्या साहित्यातील गुरुभक्ती येथे मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

**नाथ संप्रदाय आणि 'गुरुविचार'**

नाथ संप्रदाय प्राचीन संप्रदाय आहे. नाथ संप्रदाय विविध नावांनी ओळखला जातो. 'गुरुमार्ग' हे ही नाव नाथ संप्रदायाला दिले आहे. श्री.शं.बा.जोशी यांनी आपल्या 'मऱ्हाटी संस्कृती' या ग्रंथात हे नाव वापरले आहे. नाथ संप्रदायातील गुरुभक्तीप्रधान साधन प्रणालीही यामध्ये समावेश आहे. नाथ संप्रदायात असलेली 'गुरुभक्ती' पाहून हे नाव यथार्थ वाटते.

गोरक्षनाथांचे चरित्र पूर्णत: गुरुभक्तीने ओतप्रोत भरलेले आहे. गोरक्षनाथांनी गोरक्षवानीत 'निगुरु न राहिला' म्हणजे गुरुविन राहू नकोस असा इशारा दिला आहे. आदर्श गुरुभक्ती 'पतितपावन' शिष्य असलेल्या गोरक्षांनी विषयात रुतलेल्या गुरुंना वर खेचून त्यांचे स्थान मिळवून दिले.

आदिनाथ - मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ या क्रमाने ज्ञानदेवांना लाभलेल्या नाथ संप्रदायाचा वारसा पुढे ज्ञानदेवांनी आपल्या वाणीच्या मुशीतून समृध्द केला. तसेच या संप्रदायातील श्री चिंतामणिनाथ यांच्या प्रस्तुत 'ज्ञानकैवल्य' ही ग्रंथ म्हणजे नाथ संप्रदायाच्या परमार्थाच्या वाटचाल करणाऱ्या साधकांसाठी गुरुसेवेचे विधिविधान सांगणारा हा विवरणात्मक ग्रंथ आहे. 'ज्ञानकैवल्य' म्हणजे ज्ञानानेच कैवल्यप्राप्ती होते, असे सांगणारा तत्वविवेचक ग्रंथ असला तरी ह्या मध्ये सद्गुरुसेवेची महती, सद्गुरुसेवेची रीती, विस्ताराने विवरणस्वरुपात सांगितली आहे.

'ज्ञानकैवल्य' हा चिंतामणी नाथांनी लिहिलेला ग्रंथ आणि 'ज्ञानप्रदीप' हा शिवदोन केसरींचा ग्रंथ हे दोन्ही ग्रंथ म्हणजे गूरुपरंपरा आणि गुरुभक्तीचा विचार मांडणारे आहोत. चिंतामणीनाथांना आपल्या गुरुपरंपरेला सार्थअभिमान आहे. ग्रंथातील ओव्यांची रचना छंदोबध्द असल्याने त्याच्या काव्यमय स्वरुपाचा विचार न करता एका गुरुभक्ताने गुरुचरित्राचे जे सांप्रदायिक स्वरुप गुरुसेवेच्या स्वरुपात सादर केले आहे.

साधकांच्या दृष्टीकोनातून या ग्रंथाला महत्त्व आहे. या ग्रंथाच्या पहिल्या पाच प्रकरणात गुरुसेवेचा विधी विस्ताराने सांगितला आहे. काया, वाचा, मन या त्रयींच्या सर्वस्व अर्पणाने गुरूसेवा कशी करावी हे सांगण्यासाठीचा ज्ञानकैवल्य ग्रंथाची रचना झाली असे म्हणावे लागेल. या ग्रंथात लेखकाने श्री चिंतामणीनाथांनी गुरुसेवेच्या साधनेमधील बारीकसारीक तपशील चिंतामणीनाथांनी दिले आहेत. "गुरुपाद" गवसल्याविना महत्सुखाची प्राप्ती होणार नाही, असे ते सांगतात. स्वानुभवातून ते सांगतात.

मने करावे गुरुध्यान । मन सद्गुरुत्वे वंदन ॥
मने तीर्थप्रसाद सेवन । मने एकाग्र गुरुपायी ॥
मने करावी धारणा । मने आत्मयोग विचारणा ॥
मने जावे निरंजना । विचारपंथे करोनिया ॥
मने करावी मानसपूजा । मने ध्यावा श्री गुरुराजा ॥
ऐसा देव नाही दुजा । म्हणोनि योजा मन तेथे ॥
ऐसे करिता साधन । सहजचि जाले मन अर्पन ॥
म्हणोनि कायावाचामन । देऊन गुरू संतोषवी ॥

चितांमणीनाथांनी गुरुसेवेचे महत्त्व सांगून काया, वाचा, मनाने प्रत्येक क्षणी गुरुंना भजावे सांगितले. नाथ संप्रदायाचे अधिष्ठान गुरूसंस्थेवर संन्यासयोगावर, हठयोगावर, अधिष्ठित आहे. नाथ संप्रदायातील शिवदीनकेसरी, यांनीही आपल्या 'ज्ञानप्रदीप' ह्या ग्रंथात गुरु, गुरुसंस्था, गुरुसेवेचे, अनन्यसाधारण महत्त्व वर्णिले आहे.

हा ग्रंथ म्हणजे ज्ञानाच्या मार्गावरुन जाणाऱ्या साधकास योग्य मार्ग दाखविणारा प्रदीप होय असे शिवदीन केसरी आपल्या ग्रंथाविषयी म्हणतात. या ग्रंथात अनेक दंतकथा येतात. त्यातही गुरुंवरील श्रध्दा व भक्ती ओतप्रोत भरलेली आहे. शिवदीन नाथांनी पदे गुरु गौरवाने भरलेली आणि भारलेली आहेत.

माझी देवपूजा देवपूजा । पाय तुझे गुरु राया ॥
गुरु चरणाची माती । तेचि माझी भागीरथी ॥
गुरु चरणाचा बिंदू । तोचि माझा क्षीरसिंधू ॥

अशी अनेक गुरुभक्तीपर पदे शिवदीनाथांनी रचली. त्यामधूनच गुरुविषयक भावभावनांचा कल्लोळ जाणवतो. तत्वज्ञानाचा वरचष्मा गुरुविषयक पदात आढळतो. तर कुठे भावनिक फुलोरा फुलतो. गुरु आणि परमेश्वर एकरुपच आहेत. गुरुविषयक पदे म्हणजे भावनेच्या पातळीवरील मनाचा सहज सुंदर, लोभसवाणा आणि प्रांजळ आविष्कार आहे. साध्या, सोप्या पण रसाळ भाषेतून त्यांनी आपल्या भावना आणि गुरुंचा आदर व्यक्त केला आहे.

गुरुंची महती वर्णन करणाऱ्या पंधरा संस्कृत श्लोकावर 'ज्ञानप्रदीप' हा ग्रंथ निर्माण झाला आहे. या पंधरा श्लोकांना कवी 'गुरुगीता' म्हणतात.

पंचदसी सदगुरु स्तोत्र । पवित्र वदला पंचवक्र ॥
पार्वतीचे ऐकोन स्तोत्र । जाले सत्पात्र अर्थामृत ॥ (ज्ञानप्रदीप ७५९)

या पंचदशी गीतेतून शिवदीन नाथांनी सदगुरुची महती सांगितली आहे. या ग्रंथातही विसाव्या अध्यात सदगुरु महती वर्णिली आहे. येथे गणेश वंदनापूर्वी शिवदीन नाथांनी गुरुंना प्रथम वंदन करून ग्रंथ निरुपण केले आहे. गुरुंची महती आपल्या गुरुंच्या नावाबरोबर आपले नाव जोडून सांगितली. शिवदीनकेसरी म्हणवून घेण्यात त्यांना सन्मान वाटतो. यावरुन शिवदीनकेसरी नाथांचे जीवन तसेच ग्रंथलेखन सदगुरु समर्पित होते हे लक्षात येते.

**संत ज्ञानेश्वर आणि 'गुरुभक्ती' :**

संत ज्ञानेश्वर मराठी संतपरंपरेचे आद्याचार्य म्हणून मानले जाते. श्री संत ज्ञानदेव आणि गुरुभक्ती ह्यांच्या विचार केला तर गुरुभक्ती ह्यांचा विचार केला तर गुरुभक्ती कशी असावी, गुरुंचं महत्त्व अध्यात्मातील गुरुंच स्थान, गुरुंची महती या ठिकाणी पहावयाची आहे.

संत ज्ञानेश्वरांनी आयुष्यातील 'सदगुरु' हे स्थान परमात्म्यापेक्षाही श्रेष्ठ वर्णिले आहे. ज्ञानदेवांचे ज्येष्ठ बंधूच श्री निवृत्तीनाथ होते. तरीही ज्ञानदेवांच्या 'भावार्थदिपिकेतून' गुरुगौरव ओसंडून वाहत आहे. बंधुत्त्वाच पार्थिव नातं येते अडथळा झालेला नाही.

आपल्या प्रज्ञेचे, प्रतिभेचे नि परमानुभूतीचे सारे श्रेय त्यांनी गुरुकडे दिले आहे. त्यांच्या गुरुगौरवाचा एक असाधारण विशेष हा आहे की, गुरुला त्यांनी अनेकवार माऊलीच्या रुपात वर्णिले आहे. गुरुला 'गुरुमाऊली' म्हटले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी प्रत्येक ठिकाणी आपले गुरुरुपी जे गुढ रहस्य उकलले आहे ते ज्ञान निवृत्तीनेच प्रदान केले आहे असे स्वत: संत ज्ञानेश्वर म्हणतात. आपल्या गुरुंची स्तुती करतांना 'गुरु' हे बंधन आणि मुक्तीच्या पलीकडे आहेत.

ज्ञानेश्वरी ग्रंथांच्या सर्वंचे अध्यात्माची सुरुवात गुरुस्तवनाने नमनाने केली आहे. ग्रंथाचे कार्यकरण, आणि ग्रंथ श्रेष्ठत्वच गुरु निवृत्तीनाथांना बहाल केले आहे. यातच ज्ञानेश्वरांनी केलेल्या गुरु श्रेष्ठत्वाचा महिमा व गुरु भक्तीचा आविष्कार होतो.

आदिनाथ गुरु सकळ सिध्दांचा । मच्छींद्र तयाचा मुख्य शिष्य ॥
मत्सेंद्राने बोध गोरक्षांसी केला । गोरक्षा बोळला गहिनीप्रती ॥
गहिणी प्रसादे निवृत्ती दातार । ज्ञानदेवा सार चोचलिले ॥

वरील अभंगात ज्ञानदेवांची गुरू परंपरा वर्णिली आहे. यावरुन स्पष्ट होते. नाथ संप्रदायाची परंपरा ही गुरु परंपरा ज्ञानदेवांची आहे. पारमार्थिक पथावर चालताना, तसेच परमार्थ येणारे नैराश्याची काळोखी रात्रीची पायवाट उजळून निघण्यासाठी सदगुरुची आवश्यकता असते. त्याशिवाय हा कठिण घाट सर करणे अशक्य हे ज्ञानदेव जाणून होते. म्हणूनच त्यांनी सदगुरुची महती सर्वत्र मुक्तकंठाने गायिली आहे.

ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी गुरुंमहिमा वर्णन केली आहे. श्री गुरुची महिमान पूर्णपणे जाणने हे कल्पतरुवर फुलोरा चढविले क्षीरसागरास पाहूणचार करणे, कर्पूरवास सुवास देणे किंवा चंदनास या प्रमाणे हास्यास्पद असून श्री गुरुचरणी उगीच माथा ठेऊन त्यांचं 'निवांत नमन' करणे हेच होय. तेथे स्तुतीची बोलणी व्यर्थ असे ज्ञानदेव म्हणतात.

**गुरु गौरवाचे वैभव :**

ज्ञानेश्वरांनी १५ व्या अध्यायाच्या आरंभी आपुल्या हृदयाच्या चौरंगावर श्री गुरुच्या पादुकांची भावांजली वाहून केलेली मानसपुजा बहारदार आहे.

प्रथम नमू तो गुरुदेवो । जेध निमाले भावाभावो ॥
अनादि स्वरुप स्वयंमेवो । जेथे व्दैताचा दुष्काळ ॥
स्वरुपी स्वरुप केवळ । तो अढळ नमियेला ॥

येथे ज्ञानेश्वर प्रथम गुरुंना वंदन करतात. या परब्रम्हस्वरुप, गुरुदेवांचे स्वरुप असे विलक्षण आहे की, ज्यांच्या ठिकाणी भाव आणि अभाव असाही भेद राहात नाही. ज्ञानदेव म्हणतात मन ज्यांच्या चिदांसामुळे निर्माण होते ते मूळ आत्मचैतन्य सदगुरु शुध्द परब्रम्ह स्वरुपात व्दैताचा दुष्काळ आहे. सदगुरु असे एकमेवाव्दितीय आहेत की, त्यांच्या स्वरुपात त्यांचेच स्वरुप आहे. त्यांच्या शिवाय दुसरे काही नाही असे ज्ञानदेवांना वाटते.

गुरु हा संतकुळींचा राजा । गुरु हा प्राणविसावा माझा ।
गुरुविण देव नाहीं दुजा । पाहतां त्रिलोकीं ॥१॥
गुरु हा सुखाचा सागर । गुरु हा प्रेमाचा आगर ।
गुरु हा धैर्याचा डोंगर । कदाकाळीं डळमळेना ॥२॥

गुरु हा सत्यालागीं साह्य । गुरु हा साधकांसी माय ।
गुरु हा कामधेनु गाय । भक्तांवरी दुभतसे ॥३॥
गुरुहा भक्तीचें मंडण । गुरु हा काळासी दंडण ।
गुरु हा करितसे खंडण । नानापरी पापाचें ॥४॥
गुरु हा वैराग्याचे मूळ । गुरु हा परब्रह्म केवळ ।
गुरु दाखवी तात्काळ । गांठी लिंग देहाचें ॥५॥
गुरु हा घाली ज्ञानांजन । गुरु हा दाखवी निजधन ।
गुरु हा सौभाग्य देऊन । स्वात्मबोध नांदवी ॥६॥
काया काशी गुरु उपदेशी । तारकमंत्र दिला आम्हांसी ।
बाप विठ्ठल रखुमायेसी । विठ्ठल विनवी गुरुचरणी ॥७॥
गुरु ज्ञान नाही ज्यासी । तरणोपाय नाही त्याशी ।
तो नावडे ऋषींकिशी । व्यर्थ जन्मासी तो आला ॥८॥

महाराष्ट्राच्या संत मांदियाळीत ज्ञानेश्वरांचे स्थान पहिले आहे. त्याच्यानंतर संत सज्जनांनी मालिकाच तयार झाली. या दृष्टीने ज्ञानेश्वरांचे 'गुरु' 'निवृत्तीनाथ' हे संतकुलाचे राजेच होते.

ज्ञानदेव म्हणतात, गुरुदेवतेचे माझ्या अंत:करणात इतके अनन्य साधारण महत्त्व आहे, की ते माझ्या प्राणाचा विसावाचा आहेत. सदगुरु वैराग्याचा उगमच होत. ते साक्षात शुध्द परब्रम्ह आहेत. त्यांच्या दृष्टीने जीवाची, देहाची गाठ उकलते.

'गुरु' ज्ञान अंजनाने संसाराची आरसाच दाखवितात, तसेच आपल्याला ठायी असलेल्या अव्दय परमात्मावृत्ताच्या निजधनाची ओळख करुन देतात. त्यामुळे भक्ताला चिरंतन आत्मसुखाचे सौभाग्य लाभते. आत्मस्वरुपाचा बोध सदगुरु नुसता करत नाहीत. तर तो शिष्याच्या हृदयात अखंड नांदवितात.

श्रेष्ठ शिष्याला, ज्याची निष्ठा सदगुरुचरणी असते. त्याला सदगुरु माऊली, माय वाटते. साधकावर नितांत कृपादृष्टी सदगुरु करतात. त्यामुळे इच्छापूर्ती कामधेनू गायच जणू वाटते. चारही मुक्तीची दरवाजे सदगुरु कृपेने उघडली जाऊन दुष्टांचे निर्दालन आपोआप होते. दृष्ट म्हणजे षङरिपूंचे भय उरत नाही. 'गुरु' काया उपदेशिले तरी 'आत्म'बोध तारक मंत्र देऊन जन्म सार्थकी लावतात. सदगुरु कृपा झाल्यानेच विठ्ठलाचे ध्यान निरंतर लागले अशी प्रामाणिक कबुली संत ज्ञानेश्वर देतात. त्यांची आज्ञा मानावी असा दंडक पारमार्थिक जीवनात सर्वत्र पाळला जातो.

एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी पराक्रमी, निश्चयी, शिस्तबध्द आणि तेजस्वी पुरुष होते. 'संत एकनाथ' गुरु शोधार्थात पैठणला जनार्दन स्वामींच्या भेटीस आले. जनार्दन स्वामींना पाहताक्षणींचा एकनाथांचे देहभान हरपले आणि गुरुचरणावर स्वत:ला झोकून दिले. 'गुरु साक्षात परब्रम्ह' याच भावनेतून एकनाथ गुरुसेवा करत.

सदबुध्दी साधायची असेल जननी जठरातून लाभलेला जन्म पुसून गुरुदिक्षेतून नवा जन्म प्राप्त करायला हवा. असे नाथांचे म्हणणे आहे.

गुरूपासोनि दीक्षाग्रहण । तें पुरुषासी नवें जन्म जाण ।
गुरु मायबाप संपूर्ण । तें ऐक लक्षण उद्धवा ॥
उपजलिया बाळकासी तत्त्वतां । पंचविध जाण पिता ।
जनिता आणि उपनेता । तिजा प्रतिपाळिता अन्नदानें ॥
जो भयापासूनि सोडविता । जे बंधविमोचन करविता ।
जो देहाचें मरण चुकविता । तोही पिता शास्त्रार्थें ॥
यांवेगळा पांचवा पिता । जो झाडणी करी पंचभूतां ।
मृत्यूपासून सोडविता । जो गर्भव्यथा निवारी ॥
ज्याचे देखिलिया चरण । बांधूं न शके भवबंधन ।
तो सद्‌गुरु पिता जाण । भाग्येंवीण न पाविजे ॥

संत एकनाथांनी येथे पाच पितांचे विवरण केले. जनिता (जन्म देणारा), उपनेता (उपनयन करणारा), प्रतिपाळिता (अन्नदानाने पोसणारा), भय-बंध-मरण चुकवणारा (संकटहरण करणारा), आणि सद्‌गुरु असे पाच पिता सांगितले. जन्म देणाऱ्या पित्यापेक्षा, जन्म सार्थकी लावणारे पिता श्रेष्ठ तसेच एकनाथांनी सदगुरुंना माऊली पण म्हटले आहे. म्हणजे सदगुरु माता-पिता असून जन्म देणाऱ्यांपेक्षा, श्रेष्ठ आहेत कारण मिळालेला जन्म सार्थकी लावण्याची क्षमता ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी आपल्या सदगुरुंना सर्वस्व मानले. अध्यात्मातील सदगुरुंना अधिकार श्रेष्ठ मानला. ग्रंथ कर्तृत्वाचे सारे श्रेय आपल्या सदगुरुंना दिले. ज्ञानेश्वरीतील निरनिराळ्या अध्यायांच्या प्रारंभी किंवा त्या त्या अध्यायाच्या समारोप प्रसंगी ज्ञानदेवांनी गुरुचा गौरव केलेला आहे.

'अमृतानुभव या ग्रंथातूनही ज्ञानेश्वरांनी गुरुमहिमा गायला आहे. अमृतानुभवाच्या सुरुवातीला याच श्लोकांतून आणि एका स्वतंत्र प्रकरणातूनही गुरुंचे स्तोत्र गायिले आहे. 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाची, पत्र संवादाची प्रेरकशक्तीही निवृत्तीनाथच आहेत. अशा प्रकारे सर्व ग्रंथाच्या कार्याचे, कर्तृत्व आपल्या गुरुमाऊलींना श्री निवृत्तीनाथांना बहाल करुन स्वत:ला ज्ञानेश्वर धन्य-धन्य पावलो असा भाव स्पष्ट करतात.

**संत एकनाथांची गुरुभक्ती :**

संत एकनाथ संत मांदियाळितील प्रमुख संत यांनीही आपल्या भागवतटीकेत जर जागोजागी गुरु गौरव, गुरुमहिमा वर्णन केली आहे.

संत एकनाथांनी ज्ञानेश्वरांप्रमाणे सदगुरु श्री जनार्दन स्वामींना 'माऊली' उपमा दिली. एकनाथ गाथेत नाथ म्हणतात.

मजलागी माझी सदगुरुमाऊली ।
करी कृपामाऊली वर्णू काय ॥

हे नाथांचे उद्‌गार प्रतिनिधिक मानायला हरकत नाही. सद्‌गुरुंचे महिमान असाधारण असल्याने सर्वत्र संतांनी, पारमार्थिकांनी नि:संकोचपणे मान्य केले आहे. गुरुंकडे मनुष्यबुध्दीने पाहू नये, 'सदगुरु तोचि परब्रम्ह' या भावनेने त्यांची सेवा करावी.

ही फक्त सद्‌गुरुंमध्ये असते. 'जनिता' म्हणजे स्थूल जन्म देणारा आहे, तर सदगुरु जन्माचा संस्कार पुसून नवा जन्म देणारे आहेत. जो उच्च पातळीवरचा आहे. जन्म देणारी माता ही बाळाला उदरातून बाहेर टाकून मग कळवळ्याने जवळ करते. तर 'सदगुरु' माऊली 'बाहेरच्या' बालकाला उदरी घेऊन त्याच्यावर स्नेहवर्षाव करते. त्यामुळे संत एकनाथांनी सदगुरुला श्रेष्ठत्व बहाल केले आहे.

संत एकनाथ नेहमी प्रार्थना करत की, गुरुंच्या सेवेसाठी अफाट सामर्थ्य लाभावे. गुरुंचा आनंद एकनाथांचा आनंद होता. गुरुंची वाणी हेच त्यांच्यासाठी शास्त्र होते. गुरुंची मूर्ती हीच त्यांच्यासाठी परमेश्वर रूप तर गुरुंचे निवासस्थान म्हणजे त्यांच्यासाठी साक्षात स्वर्ग होता. गुरुसेवा ही श्रेष्ठ मानून एकनिष्ठ भावाने एकनाथांनी गुरुसेवा केली.

'गुरुआज्ञा' एकनाथांनी पालन केली. एकनाथी भागवतातील तिसाव्या अध्यायात सदगुरुची भक्तीच सांगितली आहे. " तस्मात गुरुं प्रपद्‌येत" असे वचन येताच नाथांना गुरुभक्तीचे उधान भरते येते. गुरुभक्तीचे वर्म नाथांनी दहाव्या अध्यायात सांगितले.

ऐसी सद्‌गुरूची स्थिती । एकोनि शिष्याच्या चित्ती ।।
वाढली अति प्रीती । गुरुभक्ती लागोनी ।।
सद्‌गुरु प्रत्यक्ष न भेटतां । मनेंचि पूजी गुरुनाथा ।।
परमादरें पूजा करितां । प्रेम तत्वता नै सडे ।।

गुरुभक्तीने जीवाला स्वरुपानुभूती प्राप्त होते. नाथांची गुरुभक्ती त्यांच्या प्रत्येक कृतीतून स्पष्ट होते.

'धृत थिजले की विधूरले । परि धृतपला नाही मुकले ॥
तेवी अमूर्त मूर्त भुसावले । परि ते संवले परब्रम्ह ॥

गुरुभक्तीने जीवाला अशी प्रचीती येते व त्याचा परमात्माही अंकित होतो. एवढा 'गुरुभक्तीचा' अधिकार आहे.

नाथ अभंगातून गातात.
गुरु परमात्मा परेशु ।
ऐसा ज्याचा दृढ विश्वासु ॥१॥
देव तयाचा अंकिला ।
स्वयें संचरा त्याचे घरा ॥२॥
एका जनार्दनी गरुदेव ।
येथें नाहीं बा संशय ॥३॥

गुरुकृपेने तादाम्य झालेला अवस्थेत नाथांनी 'भागवत' लिहिले आहे. ती तादाम्यता म्हणजेच गुरुभक्ती या गुरुभक्तीचा कळस म्हणजे ग्रंथरचनेचे सर्व ग्रंथ श्री गुरुजनार्दन स्वामींनाच दिले.

"सदगुरुविण ब्रम्हज्ञान । सर्वथा नव्हे जाण" ॥

आत्मरुप 'आयते' म्हणजे सिध्दच असले तरी ते सदगुरुच्या व्दाराच प्राप्त करुन घ्यावे हे त्यांनी पुन:श्च सांगितले आहे.

'सदगुरु सेवा ते माझे भजन । गुरु आम्हा भिन्नभावो नाही"॥

एकनाथांचा गुरुविषयक आदरभाव जागोजागी दिसतो. प्रत्येक ओवीतून एकनाथांना गुरुविषयीचा निष्ठाभावच ईश्वरभक्तीचा प्रत्यय येतो. प्रत्येक ओवींतून एकनाथांचा, गुरुविषयीचा निष्ठाभावच ईश्वरभक्तीचा प्रत्यच येतो. गुरुला नाविण्यपूर्ण उपमा देऊन नाथांनी गुरुचा गौरव वाढविला आहे.

तेथे पर ब्रम्हैक प्रसिध्द । कोंदला ठाके सच्चिदांनद ॥
ऐसा गुरु वाक्ये प्रबोध । शिष्य अतिशुध्द पावती ॥
गुरु ब्रम्ह दोन्ही समान ।
काया वचि मने प्राण जो । गुरु वाचोनि आन नेणे ॥
ते साचि भजे- अनन्यपणे । गुरुभक्ती म्हणजे त्या नांव ॥

काया, वाचा, मनाने तसेच, सातही प्रहरी गुरुसेवेने आणि गुरुभक्तीत तल्लीन व्हावे असे एकनाथ सांगतात.

नाथांनी सदगुरुला अतिशय महत्त्व देतात, गुरु हा परमार्थसाधनेच्या मार्गावरील 'सांगाती' आहे तोच, शिष्यावर पुत्रवत प्रेम करतो. त्याला मायेच्या स्वरुपाची जाणीव करुन देतो. तो देहाआड प्रतीत होणाऱ्या स्वत:च्या चैतन्य, स्वरूपाची ओढ करुन देऊन भक्तीभावाने आनंदस्वरुपी लीन व्हावयास त्यास मदत करतो. 'सदगुरुवाचून आत्मज्ञान वा ब्रम्हज्ञान होणे शक्य नाही. हा नाथांचा सिध्दांत आहे.'

संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथांचे संपूर्ण जीवनच गुरुतत्वाने भारावलेले आहे. सर्व संतांनी सदगुरुंना शिरोधार्य मानले आहे. इथे संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथांनी गुरुभक्ती मांडली आहे.

**निष्कर्ष :**

'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव केलेला गुरुगौरव उजोड, अतुलणीय आहे.

ज्ञानेश्वरांच्या स्फुट काव्यातील 'गुरुतत्व' महिमाही अपूर्ण व प्रत्ययकारी आहे.

ज्ञानेश्वर श्री गुरुनिवृत्तीनाथांना माऊली म्हणतात.

नाथांची अनन्य, अपार, अविचल, गुरुभक्ती हीच त्यांच्या समग्र जीवनामागची एकमेव प्रेरक शक्ती होय.

गुरुसेवेच्या काळातच गुरुआज्ञेने त्यांनी ग्रंथरचनेला सुरुवात केली. त्यांची 'चतु:श्लोकी भागवता' वरील प्राकृत भाषेतील पहिली टीका पूर्ण केली.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) डॉ. वा.ल. मंजूळ, 'नाथ संप्रदायाचा इतिहास व परंपरा' 'सकाळ प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे'. प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २०२१, पृष्ठ क्र. ३१
2) डॉ. मंगला वैष्णव, रजत प्रकाशन, टिळकनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १३ एप्रिल २०१९, पृष्ठ ४६, तत्रैव पृष्ठ क्र. ४६

3) तुळपुळे शं.गो. 'पाच संतकवी'. सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे

4) सौ. कुलकर्णी अनुराधा, 'पंचतीर्थ खंड १ला' 'व्यास क्रिएशन', डी-४, सामंत बॉक्स, नौपाडा, ठाणे. प्रथमावृत्ती, ३ फेब्रुवारी २०१०, पृष्ठ क्र. १५

5) ढेरे. गा. चि. , 'संत, लोक आणि अभिजन' पद्मगंधा प्रकाशन, पांडुरंग कॉलनी, एरंडवणे, पुणे. पृष्ठ क्र. ११८

6) डॉ. शिवाजी पाटील, "संत साहित्यातील गुरुरुप' रजत प्रकाशन, टिळकनगर, औरंगाबाद प्रथमावृत्ती, मार्च २००४

एकनाथ असे अव्दितीय संत कवी तसेच त्याचे चरित्रही आदर्शवत आहे. त्यांच्या अपार गुरुसेवेने त्यांना अल्पवयातच ब्रम्हसुखाची प्राप्ती झाली.

श्री एकनाथ म्हणजे गुरुभक्ती व गुरुभक्ती म्हणजे एकनाथ असे समीकरण आहे. सूर्यावेगळा प्रकाश नाही, तव्दत नाथावेगळी गुरुभक्ती नाही.

'चतु:श्लोकी भागवतात' सदगुरुवर्णन करताना नाथांची वाणी कुंठित होते. सदगुरुलाच परमेश्वर मानणे हीच 'गुरुभक्ती' आहे.